# १२. गोधडी

**डॉ. कैलास दौंड** (१९७३) : मराठी ग्रामीण कादंबरीकार. ग्रामजीवनातील वास्तवाचे चित्रण करणारे लेखक-कवी म्हणून प्रसिद्ध. त्यांच्या 'पाणधुई' व 'कापूसकाळ' या कादंबऱ्या; 'उसाच्या कविता', 'वसाण', 'भोग सरू दे उन्हाचा', 'अंधाराचा गाव माझा' हे कवितासंग्रह; 'एका सुगीची अखेर' हा कथासंग्रह; 'तऱ्होळीचं पाणी' हा ललित लेखसंग्रह इत्यादी लेखन प्रसिद्ध. लेखनासाठी पंचवीसहून अधिक साहित्य पुरस्कारांनी सन्मानित.

गोधडी हे केवळ पांघरूण नव्हे, तर दारिद्र्याने पोळलेल्या जगण्यावर फुंकर घालणाऱ्या प्रेमाचा, मायेचा स्पर्श होय. गोधडी हे आईवडिलांच्या कष्टमय जीवनाचे प्रतीक आहे. गोधडीच्या रूपाने कौटुंबिक नात्यामधील आठवणींचा गोफ विणला आहे. याविषयीचे भावस्पर्शी चित्रण प्रस्तुत कवितेतून कवीने केले आहे. प्रस्तुत कविता 'उसाच्या कविता' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

गोधडी म्हणजेच
नसतो फक्त चिंध्यांचा बोचका
गोधडी म्हणजेच गोधडी असते.
मायेलाही मिळणारी ऊब असते.
गोधडीला असते अस्तर
बापाच्या फाटक्या धोतराचे
किंवा
आईला बापाने घेतलेल्या
फाटक्या लुगड्याचे
आत-
गोधडीत
अनेक चिंध्या असतात
बसलेल्या दाटीवाटीनं
आईनं दटावून बसवलेल्या.
तेव्हा त्या फक्त चिंध्याच नसतात
त्यात असतो
मामानं घेतलेला, भाच्याचा
जीर्ण कुडता
माहेरातून आलेलं
आईच्या लुगड्याचं पटकुर
आणि
पहिल्या संक्रांतीला
बानं घेतलेलं-
आईनं असंख्य ठिगळं लावलेलं
तिचं लाडकं लुगडं
आणि
बाच्या कोपरीच्या बाह्या
आईनं ते सगळं
स्मृतीच्या सुईनं
शिवलेलं असतं त्यात.
म्हणून गोधडी म्हणजे
नसतो चिंध्यांचा बोचका
ऊब असते ऊब!



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **गोधडीची वैशिष्ट्ये**

(आ) **गोधडीत चिंधीच्या रूपाने आठवणीत दडलेल्या व्यक्ती**

**प्र. २. कवितेच्या आधारे आईची वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) ............. (आ) ............ (इ) ............ (ई) ............

**प्र. ३. तुमच्या घरातल्या एखाद्या जुन्या वस्तूशी जुळलेले तुमचे भावनिक नाते तुमच्या शब्दांत व्यक्त करा.**

**प्र. ४. आईविषयीच्या भावना व्यक्त करणारे कवितेतील शब्द/शब्दसमूह लिहा.**

**प्र. ५. खालील ओळींतील भाव स्पष्ट करा.**

(अ) 'गोधडीला आईच्या फाटक्या लुगड्याचे आणि बापाच्या फाटक्या धोतराचे अस्तर असते.'

(आ) 'गोधडी म्हणजे नसतो चिंध्यांचा बोचका, ऊब असते ऊब.'



## लिहिते होऊया.

- **'गोधडीचे आत्मकथन' या विषयावर दहा ते पंधरा ओळी निबंध लिहा.**

**उपक्रम :** आईने घरातील टाकाऊ वस्तूंपासून जशी स्वकष्टाने गोधडी बनवली, तशी 'मकरसंक्रांत' या सणाला प्रेमाची भेट देण्यासाठी टाकाऊ वस्तूंपासून भेटकार्डे बनवा. मित्रांना, नातेवाईकांना, शिक्षकांना प्रेमाने भेट द्या.

## आपण समजून घेऊया.

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो, तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचनाचा आनंद मिळवून देण्यात या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यांतील एक घटक म्हणजे 'अलंकार'.

**अलंकाराचे दोन प्रकार**

**(अ) शब्दालंकार**
यमक, अनुप्रास, श्लेष

**(आ) अर्थालंकार**
उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अपन्हुती, व्यतिरेक, चेतनगुणोक्ती इत्यादी.

(अ) आता आपण शब्दालंकारातील 'यमक' आणि 'अनुप्रास' या अलंकाराचा अभ्यास करूया.

## (१) यमक अलंकार

- खालील ओळी वाचा व निरीक्षण करा.

मना चंदनाचे परी त्वा झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ।।

अधोरेखित शब्दांच्या उच्चारांमध्ये साम्य आढळते का? [ ]

कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये, किंवा ठरावीक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास, तेथे '**यमक**' हा अलंकार होतो.

- खालील ओळी वाचा व ज्यामुळे यमक अलंकार होतो अशा समान अक्षर/शब्दांच्या जोड्या शोधा.

(अ) नाचे दरी डोंगरात झिम्मा खेळतो नदीशी
रिमझिम पहाळीचं गाणं बोलतो झाडांशी

(आ) आई, तुझ्या पुढे मी आहे अजून तान्हा;
शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा

(इ) कडीस जोडोनि दुज्या कडीला
मनुष्य बनवीतसे साखळीला

## (२) अनुप्रास अलंकार

- खालील ओळी वाचा आणि त्यांतील कोणत्या अक्षराची पुनरावृत्ती झाली आहे ते शोधून काढा.

गडद निळे गडद निळे जलद भरूनि आले.
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले.
पुनरावृत्ती झालेले वर्ण लिहा. [ ] [ ]

एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा '**अनुप्रास**' हा अलंकार होतो.

- खालील ओळींत कोणत्या अक्षरामुळे अनुप्रास झाला आहे ते सांगा.

(अ) रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल पल सलील [ ]

(आ) संत म्हणति, 'सप्त पदें सहवासें सख्य साधूशीं घडतें' । [ ]

## भाषासौंदर्य

- **आलंकारिक शब्दांची रचना करून भाषेचे सौंदर्य वाढवता येते. आपले विचार अधिक परिणामकारक, अधिक आकर्षक होण्यासाठी आलंकारिक शब्दांचा उपयोग केला जातो. खाली काही आलंकारिक शब्द दिलेले आहेत. त्यांचा अभ्यास करा व लेखनात उपयोग करा. या शब्दांप्रमाणे इतर काही आलंकारिक शब्दांची यादी तयार करा.**
  - गजान्तलक्ष्मी – श्रीमंत मनुष्य
  - गळ्यातला ताईत – अत्यंत प्रिय व्यक्ती
  - बाळकडू – लहानपणीचे संस्कार
  - काथ्याकूट – निष्फळ चर्चा
  - अष्टपैलू – अनेक बाबींमध्ये प्रवीण
  - अळवावरचे पाणी – अल्प काळ टिकणारे
  - अजातशत्रू – ज्याला कोणी शत्रू नाही असा
  - झाकले माणिक – गुणांचे प्रदर्शन न करणारा गुणी मनुष्य
  - इतिश्री – शेवट
  - अक्षरशत्रू – निरक्षर, अशिक्षित

- **वाचा आणि समजून घ्या.**

**आई** : अरे जॉन, किती हा तुझ्या कपड्यांचा ढीग?

**जॉन** : आई, काय करू मी या जुन्या कपड्यांचं?

**आई** : मुळात आवश्यक तेवढेच नवीन कपडे घ्यावेत. त्यांचा पुरेपूर वापर करावा.

**जॉन** : अगं हो, पण आता काय करू ते सांग ना!

**आई** : यातले जे कपडे वापरण्यासाठी चांगले आहेत, ते बाजूला कर. जे तुझ्या अंगाला येत नाहीत, जे फाटले आहेत ते वेगळे वेगळे कर.

**जॉन** : आई, आपण या जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करू शकतो का?

**आई** : हो, नक्कीच. त्यासाठी आपल्यात फक्त कलात्मकता पाहिजे.

**जॉन** : आई, काय काय बनवता येईल गं या कपड्यांचं?

**आई** : तुला सुट्टी आहे ना आज, चल आपण दोघं मिळून बनवूया.

(आई जॉनला पर्स, तोरण, पायपुसणी बनवून दाखवते.)

**जॉन** : आई, किती छान झाल्यात गं या वस्तू. खूपच छान दिसत आहेत. खरंच, आपण जुन्या कपड्यापासून वेगवेगळ्या सुंदर वस्तू बनवू शकतो. यामुळे नक्कीच कपड्याचा अपव्यय न होता पुनर्वापर होईल.





